श्रीमती कॅटी

आणि टश

लेखिका: पेट्रिसिया पोलाको

श्रीमती कॅटी आणि टश

मराठी अनुवादः सुशील मेन्सन

लार्नेल श्रीमती *कॅटी* यांना फारसं ओळखत नव्हता. पण त्याची आई दर दुसऱ्या दिवशी आपली कामे संपल्यावर श्रीमती कॅटी यांना भेटत असे.

“तिचा नवरा वारल्यापासून ती एकटीच असते,” त्याच्या आईने त्याला एकदा सांगितले.

एकदा श्रीमती कॅटी फोटोंचा जुना अल्बम पाहात होत्या. त्यांनी लार्नेलच्या आईचा हात घट्ट दाबला. “हा माझा नवरा, *मायरन*,” श्रीमती कॅटी म्हणाल्या. “फार वर्षांपूर्वी ते माझ्यासारखंच पोलंडहून आले होते. किती छान चाललं होतं आमचं आयुष्य! खूपच छान!” त्यांच्या गळ्यात हुंदका दाटून आला. “आम्हाला मुलं झाली नाहीत. आता मी *हन्नुका* आणि *पासोव्हर* सणांना एकटीच असते.”

मग त्या रडू लागल्या.



पुढल्या दिवशी लार्नेल स्वतःहून त्यांना भेटण्यासाठी आला.

तो म्हणाला. "आमच्या इमारतीच्या तळघरात एका मांजरीला पिल्लं झालीयत. त्यातलं हे पिल्लू मरतुकडं आणि कुरूप आहे. शिवाय, तिला शेपूटसुद्धा नाहीये. त्यामुळे लोकं तिला सोडून बाकी साऱ्या पिल्लांना घेऊन गेले."

"कुरूप म्हणू नकोस," श्रीमती कॅटी म्हणाल्या. "माझा *मायरन* लहान होता तेव्हा कुरुपच होता. पण मोठा झाल्यावर तो एक चांगला माणूस बनला."

श्रीमती कॅटीने मांजरीच्या पिल्लाकडे बघितले.

"ताऱ्हुलं आहे....बछडं....शेपटीसुद्धा नाही," श्रीमती कॅटीने पिल्लाला जवळून निरखलं.

मग त्यांनी लार्नेलच्या चेहऱ्याकडे बघून म्हटलं, "लार्नेल, मी हिला माझ्याजवळ ठेवते. पण तू रोज इथे यायचं आणि हिला सांभाळण्यासाठी मला मदत करायची. मी आधी कधी मांजर पाळलेलं नाही."

लार्नेलने त्यांची अट मान्य केली.

"मी पिल्लाचं छान यहुदी नाव ठेवते," श्रीमती कॅटी म्हणाल्या. "हिला शेपटी नाही, पण छान दात आहेत. आपण हिला *टश* म्हणू."

छोटीशी टश हळूहळू सुदृढ आणि काटक बनली. श्रीमती कॅटी टशसाठी खायला बनवू लागल्या, तिला ब्रशने स्वच्छ करू लागल्या, तिच्यासाठी खेळणी विणू लागल्या, एवढंच नव्हे तर, तिला पुस्तकही वाचून दाखवू लागल्या.

“किती छान आहे हे पिल्लू!” टशला खेळताना पाहून त्यांना आनंद मिळू लागला. श्रीमती कॅटी टशच्या प्रेमात बुडून गेली.

लार्नेलने दिलेले वचन पाळले. तो दररोज शाळा सुटल्यावर श्रीमती कॅटी आणि टश यांना भेटायला जाऊ लागला. तिथे त्याला खायला गरमगरम ताजे पुडींग आणि प्यायला एक मोठ्ठा ग्लास दूध मिळत असे. त्याला टशसोबत खेळायला मजा येत असे, तसेच श्रीमती कॅटीकडून जुन्या गोष्टी ऐकायलाही आवडत असे.

“मी मूळची *वॉर्सा*ची आहे. ते *पोलंड*मध्ये आहे, माहितीय. मी माझा चुलत भाऊ *मोयश*कडे कपडे शिवायचे काम करायला इथे आले. तेव्हा मला इंग्रजीचा एकही शब्द बोलता येत नव्हता.”

“मग तू लोकांशी बोलायचीस कशी?” लार्नेलने विचारले.

“मी बोलायची नाही कुणाशी,” त्या उत्तरल्या. “मी खूप रडायची त्या काळात....मग मला मायरन भेटला. मी बनवलेल्या पुंडींगची चव त्याने घेतली आणि मला लग्न करशील का, म्हणून विचारलं.”

“यात काही शंका नाही,” लार्नेल म्हणाला आणि त्याने आणखी थोडे पुडींग खाल्ले.

“मायरन आणि मी कॅट्स्किल्स डोंगरातल्या रेसॉर्टमध्ये सुट्टी घालवायला जायचो. ते रेसॉर्ट यहुदी लोकांना राहाण्यासाठी होतं.”

“म्हणजे, यहुदी लोकांना पाहिजे तिथे राहाता येत नव्हतं?” लार्नेलने विचारले.



श्रीमती कॅटी काहीच बोलल्या नाहीत. त्या एका पेटीजवळ गेल्या आणि त्यातून काही जुने कपडे काढले.

“माझ्या आजीने मला अशा काही जागा सांगितल्या होत्या, जिथे ती राहू शकत नव्हती,” लार्नेल हळूच बोलला.

“लार्नेल, तुम्ही लोक आणि आम्ही लोक सारखेच आहोत, माहितीय. आपण बरंच दु:ख सहन केलंय. आनंदसुद्धा. यातून आपली सहनशक्ती खूप वाढलीय. तू आणि मी एकसारखे आहोत, बऱ्याच बाबतीत!”

“मी काय सांगत होते? अरे हो, कॅटस्किल्स रेसॉर्ट! आम्ही दर रविवारी नवे कपडे घालून नाच करायचो,” श्रीमती कॅटी म्हणाल्या.

मग त्यांनी रेकॉर्ड प्लेयरवर रेकॉर्ड लावले. ते रेकॉर्ड खूप जुने होते. त्यावर ओरखडे होते.

“ऐकतोयस का लार्नेल?” त्या म्हणाल्या. “आम्ही याच्यावर नाचायचो. माझ्या वॉर्साचा नाच करायचो. थांब, दाखवते तुला.”

मग ते खोलीभर फिरत, मोठमोठ्याने हसत नाचू लागले.

दिवस सरत गेले तसतसे लार्नेल श्रीमती कॅटी यांच्या घरी जास्तीत जास्त वेळ घालवू लागला.

“तू माझ्या कुटुंबाचा भागच झालायस, लार्नेल,” एकदा त्या म्हणाल्या. “एकदा माझ्यासोबत चल. आपण मायरनसाठी प्रार्थना करू. तू यहुदी नाहीस हे माहितीय मला. पण मायरनला तू नक्की आवडला असतास. तू खूप चांगला मुलगा आहेस, लार्नेल!”

कबरस्थानात श्रीमती कॅटी यांनी पुस्तकात वाचून प्रार्थना केली. मग त्यांनी लार्नेलला आपल्या पतीच्या कबरीवर छोटा दगड ठेवायला सांगितले.

“याच्यामुळे आपल्याला स्मरण राहातं,” त्या हळुवारपणे म्हणाल्या. “नमस्कार, मायरन,” असे पुटपुटत त्यांनी आपल्या डोळ्यांतील अश्रू पुसले.

घरी परतताना त्या म्हणाल्या, “पुडींग! आज मी तुझ्यासाठी इतकं छान पुडींग बनवलंय, लार्नेल!”

“चल लवकर, टश आपली काळजी करत असेल,” म्हणत त्या घराकडे चालू लागल्या.



घरी पोहोचल्यावर त्यांनी टशला बऱ्याच हाका मारल्या, पण प्रतिसाद मिळाला नाही. त्यांनी सगळीकडे टशचा शोध घेतला. अचानक, श्रीमती कॅटी दचकल्या. आगीपासून बचाव करण्यासाठी असलेली खिडकी उघडी होती.

“अरे बापरे!” त्या किंचाळल्या. “निघण्यापूर्वी मी खिडकी बंद करायलाच विसरले. बिचारं बछडं! याआधी ते कधी बाहेर गेलं नव्हतं!”

“आपण शोधून काढू तिला,” लार्नेल त्यांना धीर देऊ लागला.

“अलिकडे टश विचित्र वागू लागली होती,” श्रीमती कॅटी डोळ्यांतील अश्रू पुसत म्हणाल्या. “ती बाहेर जाण्याचा प्रयत्न करायची, पण तिला बाहेर मोटरगाड्यांची धडक बसेल अशी भीती वाटायची मला.”

“मी शोधून काढेन तिला, कॅटी मावशी,” लार्नेल म्हणाला. “तुम्ही काही काळजी करू नका.”

काळोख पडू लागला.

श्रीमती कॅटी आणि लार्नेल यांनी इमारतीभोवती फिरून पाहिले.

मग ते आजुबाजुच्या परिसरात गेले.

त्यांनी काही कागदांवर टश हरवल्याबद्दल मजकूर लिहिला आणि ते कागद घरांच्या दारांवर, टेलिफोनच्या खांबांवर आणि कुंपणांवर लावले.

त्यांनी नजिकच्या लोकांकडे चौकशी केली, पण कुणीही टशला पाहिले नव्हते.

त्या रात्री एक वादळ आले.

मुसळधार पाऊसही पडला.

श्रीमती कॅटी छोट्या टशच्या काळजीमुळे नीट झोपू शकल्या नाहीत.

“किती छान होती टश!....किती प्रेमळ!” त्या पुटपुटू लागल्या.

लार्नेलही रात्रभर काळजी करत बसला.

“कॅटी मावशी काय करेल आता!” त्याच्या मनात आले.

“देवा, त्या छोट्याशा मांजरीला परत तिच्याकडे पोहोचव,” उशीत तोंड खुपसून तो हळुवार पुटपुटला.

दारावर मोठ्याने ठक् ठक् झाली. श्रीमती कॅटी जाग्या झाल्या.

दारात लार्नेलचे वडील आणि दोन शेजारी उभे होते.

“हे मांजर तुमचं आहे का?” त्यांनी विचारले.

“माझं बछडं! माझं पिल्लू!” श्रीमती कॅटी हरखल्या.

“आम्हाला ती मागच्या गल्लीत सापडली. भिजली होती, भुकेलीसुद्धा होती,” श्रीयुत *मूर* म्हणाले.

“खूप आभार तुमचे, खूप आभार!” श्रीमती कॅटी टशला बाहुंमध्ये घेत म्हणाली.

एव्हाना, टशची बाहेर जाण्याची इच्छाच जणू मरून गेली होती. ती सारखी झोपून राहू लागली. लार्नेल तिच्यासोबत खेळायला आला तरी ती झोपूनच राहीली.

"एकदा मी माझी मावशी *हवेला*च्या घरी गेले होते, पासोव्हर सणाला जेवायला. तिथेच माझी मायरनशी भेट झाली. माहितीय का तुला?" श्रीमती कॅटी लार्नेलकडे पाहात म्हणाली.

"किती छान दिवस होते ते, सगळे कुटुंबीय एकत्र असायचे. आता मी एकटीच उरलेय," त्या हळुवारपणे म्हणाल्या.

"मी येऊ तुमच्याकडे पासोव्हरचं जेवायला?" लार्नेलने विचारले.

"मी वाटच बघत होते, तू हे कधी विचारतोयस म्हणून!" लार्नेलला कुरवाळत त्या म्हणाल्या. "बघ मी तुझ्यासाठी किती रुचकर पदार्थ बनवते ते!"



“पासोव्हर सण म्हणजे सुग्रास पदार्थ,” दुकानातील गर्दीतून निघत श्रीमती कॅटी ओरडल्या. “तुमच्यासारखंच आमचीही लोकं गुलाम होती. ते त्यांच्या इच्छेविरुद्ध परक्या देशात राहात होते. त्यांना मुक्त व्हायचं होतं, म्हणून मदतीसाठी ते सतत देवाची प्रार्थना करत. मग देवाने एक दूत पाठवला. तो आमच्या लोकांना छळणाऱ्या लोकांच्या घरात दु:ख आणि मृत्यू घेऊन गेला. पण त्या दूताने आमच्या लोकांच्या घराला मात्र भेट दिली नाही.”

“पण दूताला कसं कळलं, यहुदी लोक कुठे राहातात ते?” लार्नेलने विचारले.

“त्यांनी दारावर खुणा करून ठेवल्या होत्या. त्यामुळे दूत ती घरं सोडून पुढे गेला. त्याच्यासाठीच आपण हा सण पासोव्हर नावाने साजरा करतो, मेजवानी करतो. पण ज्यांनी आपण मुक्त व्हावं म्हणून बलिदान दिलं, त्याचंही आपण स्मरण करतो,” श्रीमती कॅटी म्हणाल्या. “मेजवानीचा एक भाग दु:खाचा आहे तर दुसरा आनंदाचा!”



लार्नेलने टेबलचे कापड आणि चीनीमातीच्या प्लेट काढण्यास मदत केली. श्रीमती कॅटी म्हणाल्या, “हे कापड आम्हाला लग्नात मिळालेल्या छत्रीचं आहे. आम्ही ते काही खास दिवशी आणि सण-समारंभ साजरे करताना वापरायचो.”

“तुमच्याकडे एवढ्या वेगवेगळ्या प्लेट का आहेत?” लार्नेलने विचारले.

“कारण काही यहुद्यांना एकाच प्लेटमध्ये दूध आणि मांस खाणं आवडत नाही,” त्या उत्तरल्या.



रात्री मेजवानीला ते एकत्र बसले तेव्हा श्रीमती कॅटी यांनी दोन मेणबत्त्या लावल्या आणि त्यांच्या ज्योतीवरून हात फिरवला. यहुद्यांचे पवित्र पुस्तक वाचून त्यांनी प्रार्थना म्हटली, स्मित केले आणि म्हणाल्या, “चल, सुरू करू मेजवानी.”

सुरुवातीला त्यांनी रेड वाईन आणि पाणी सेवन केले. मग त्यांनी कडवट भाज्या, मेंढ्याचे मांस आणि कोंबडीचे मांस खाल्ले. त्यानंतर त्यांनी भाजलेले मासे, सफरचंदाच्या मसाले लावलेल्या फोडी आणि बटाट्याचे पराठे खाल्ले.

“हा पराठा सोड्याच्या फटाक्यासारखा दिसतोय!” लार्नेल उद्गारला.

“आम्ही याला *माटजो* म्हणतो. पासोव्हरला खातो आम्ही तो. त्याच्यात यीस्ट घालत नाहीत. त्यामुळे तो फुगत नाही, सपाटच राहातो.”

“लार्नेल, मी माटजोचा एक तुकडा घरात कुठेतरी लपवलाय. तू शोधून काढलास तर तुला एक छान बक्षीस मिळेल.”

ते बक्षीस म्हणजे हाताने विणलेले एक स्वेटर होते. ते त्यांनी फक्त लार्नेलसाठीच विणले होते.

पुढल्या दिवशी श्रीमती कॅटी यांनी घराच्या मागच्या खिडकीतून डोकावून लार्नेलच्या घराकडे पाहिले.

“लवकर ये....मजा दाखवते तुला!”

लार्नेल आणि त्याचे आई-बाबा श्रीमती कॅटी यांच्या घरी धावले.

“मृत्यूचा दूत निघून गेलाय, पण जीवनाचा नाही. बघा, टशने चार पिल्लांना जन्म दिलाय. आता मी आज्जी झाले.”

बरीच वर्षे निघून गेली. श्रीमती कॅटी, टश आणि त्याचे कुटुंब लार्नेलच्या कुटुंबाचा हिस्सा बनले.

त्यांच्या कुटुंबात पदवीदान समारंभ, लग्नसोहळे, नवीन अपत्यांचे जन्म आणि शेवटी दफनविधीही झाले.

लार्नेल कबरीसमोर उभा होता. तो श्रीमती कॅटी यांच्या पुस्तकातून वाचू लागला.

त्याने कबरीवर एक छोटासा दगड ठेवला. मग लार्नेल, त्याची पत्नी आणि त्यांची मुले एकसुरात कबरीवर कोरलेले शब्द वाचू लागले.

श्रीमती कॅटी, आमची आजी....किती छान होती!

अंत